N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड **P.S.(ठाणे):** दिघी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0325 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**16/07/2026 04:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिंनाक पासून):** 15/07/2026
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिंनाक पर्यंत):** 15/07/2026
**Time From (वेळेपासून):** 14:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 16/07/2026 **Time (वेळ):** 04:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 008
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 16/07/2026 04:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** दिघी पोलीस स्टेशन,पिंपरी चिंचवड पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुहास गणेशराव हट्टेकर पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे,दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9881873330

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | चैताली बाळसाहेब गपाट पद- पोलीस उप निरीक्षक दिघी पोलीस स्टेशन | | | 1. रा1202 बी/2 ग्रण्ड बे मांजरी, दिघी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनातील 500 रू | 300,000.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | दराच्या 200 नोटा हजर केल्या. व उर्वरित 2,00,000/ रूपये हे 500रू दारच्या नोटास | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

300,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गु.र.नं. 325 /2026 फिंयाद तारीख 16/07/2026
मी सुहास गणेशराव हट्टेकर, वय- 37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 9881873330
मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 14/07/2026 रोजी 15.00 वा मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.सतिश वाळके, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार युवराज महादेव खरमाटे वय 42 वर्ष व्यवसाय पत्रकार/मार्केटिंग रा.306,ई बिल्डींग, ऐश्वर्या लक्ष्मी सोसायटी, वाघोली,पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. व सदर कारवाई करीत वनविभाग कार्यालयातील हजर असलेले पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले.तसेच सापळा कारवाईकरिता अंमलदार व चालक देखील पाठविले. आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षात घेवुन जावुन त्यांची तक्रार ऐकुन घेतली. त्यांनतर 15.30 वा चे सुमारास पंच लाप्रवि कार्यालयात आमचे कक्षात आले, त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे पंच 1)श्री. संदेश मधुकर शिंदे, वय 29 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद वनरक्षक, उप वनसंरक्षक कार्यालय, वनविभाग, पुणे, रा. कांचनपुरी सोसायटी, शिवतिर्थ नगर, कोथरुड, पुणे, मो. नं.9561725925 2)श्रीमती नेहा शरद काळे, वय 27 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद वन सर्वेक्षक, उप वनसंरक्षक कार्यालय, वनविभाग पुणे, रा. अग्रवाल प्राईड, लुना नगर, एफ विंग, पहिला मजला, कसबा पेठ, पुणे, मो. नं. 9604771046असे सांगितले.त्यांची तक्रारदार युवराज खरमाटे व सापळा पथकातील अंमलदार पोहवा/3296 गदादे,मपोशि/2652 शेटे चालक पोहवा /330 काकडे,यांचेशी ओळख करून दिली. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार तोडी सांगितली. तसेच स्वहस्ताक्षरात लिहून दिली.ती थोडक्यात पुढीलप्रमाणे,
तक्रारदार व इतर 6 यांचे विरूदध दिंनाक 25/04/2026 रोजी दिघी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं. 189/2026 भा. न्या. सं. कलम 70, 309(4), 115(2),351(2), 352,356(2), 3(5) प्रमाणे 7 लोकांविरूदध गुन्हा दाखल आहे. त्याचा तपास पीएआय गपाट नेम दिघी पोलीस स्टेशन यांचेकडे आहे. सदर गुनहयाचा ब समरी अहवाल सादर करण्यारिता पीएसआय गपाट यांनी तक्रारदार व त्यांचे इतर 3 जण अशा 4 लोंकाना प्रत्येकी 2,00,000/- रुपया प्रमाणे असे एकुण 8,00,000/- रुपये मागणी केली आहे. तक्रारदार हे दिघी पोलीस स्टेशन येथे पीएसआय चैताली गपाट यांना भेटले असता त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की, जोपर्यंत तुम्ही 8,00,000/- रुपये देणार नाहीत तोपर्यंत गुन्हयाचा ब फायनल रिपोर्ट पाठवणार नाही.
दिंनाक 10/07/2026 रोजी पीएस आय चैताली गपाट यांनी मोबाईल क्रमांक 7083480110 यावरुन तक्रारदार यांचा मोबाईल क्रमांक 7741901212 यावर व्हॉट्सॲपद्वारे मॅसेज पाठविला तो तक्रारदार यांना न समजल्याने तक्रारदार दिंनाक 13/07/2026 रोजी पीएसआय चैताली गपाट यांना व्हॉट्सॲप कॉल केला असता पीएसआय गपाट यांनी तक्रारदार यांना, “जोपर्यंत तुम्ही 8,00,000/- रुपये देणार नाहीत व भेटणार नाहीत तोपर्यंत मी गुन्हयाचा ब फायनल रिपोर्ट पाठवणार नाही.” असे सांगितले.
तरी पीएसआय चैताली गपाट यांनी दिघी पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयातील आरोपी पैकी तक्रारदार व त्यांचे



Scanned with OKEN Scanner

ओळखीचे इतर 4 लोकांविरूदध दाखल असलेला गुन्हयाचा ब फायनल रिपोर्ट मा. न्यायालयात दाखल करण्याकरीता 4 लोकांचे प्रत्येकी 2,00,000/- प्रमाणे एकुण 8,00,000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. सदर रक्कम ही कुठलीही शासकीय फी नसुन लाच रक्कम असल्याची खात्री आहे. व तक्रारदार यांना पीएसआय चैताली गपाट यांना कुठलीही लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी तक्रारी अर्ज केला आहे. अशा आशयाचा लेखी अर्ज दिला आहे.

त्यानंतर पंचानी व आम्ही सदर लेखी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या आहेत. सदर तक्रारीचे अनुषंगाने दिंनाक 15/07/2026 रोजी तक्रारदार यांना पीएसआय चैताली गपाट यांनी दिघी पोलीस स्टेशन येथे बोलावले असलेने व तक्रारदार त्यांची भेट घेवुन बोलणी करणार असलेने दिंनाक 15/07/2025 रोजी पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरिवण्यात आले.

दिंनाक 15/07/2026 रोजी मी व पडताळणी पथक पंच व तक्रारदार असे कारवाईचे अनुषंगाने लाप्रवि कार्यालयात हजर असताना,तक्रारदार व पंचास शासकीय सोनी कंपनीचा व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष त्याची पाहणी केली असता, त्यावर बाजुस SanDisk Ultra 32 GB A 1 micro SD HC I दुसरे बाजुस 5472 DXASF1CY BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री युवराज खरमाटे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच निवेदन व सापळा कारवाईचे चित्रीकरण व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये कारण्यात येणार असलेचे सांगुन शासकीय सोनी कंपनीचा व्हिडीओ कॅमेरा दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर EVM Elite 32 GB micro SD V10 व मागील बाजुस MM9GC10YSB16 289 8C260107 SM MADE IN TAIWAN EVM TF /32 GB 0126SE छापलेले असल्याचे दिसुन आले.सदर मेमरी कार्ड व्हिडीओ कॅमेरामध्ये बसविले.व त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची खात्री करून दिली.व तो मपोशि शेटे यांचे ताब्यात देवुन रेकॉर्डिंगबाबत सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार व पंच यांचे डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये निवेदन घेण्यात आले. त्याचे मपोशि शेटे यांनी व्हिडीओ रेकॉर्डिग केले.तेव्हा 12.25 वाजले होते. त्यानतर मी तक्रारदार व पडताळणी/सापळा पथकास पडताळणी कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या.

त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे लाप्रवि कार्यालयात उपलब्ध असलेल्या सरकारी वाहन इरटिगा कार क्रमांक MH 12 UC 4109 हीचे मध्ये सापळा कारवाईकरिता आवश्यक सर्व साहीत्य, प्रिंटर, लॅपटॉप काळा कपडा सील साहीत्य ईत्यादी सर्व आवश्यक साहीत्य ठेवण्यात आले. पंच, पोहवा/गदादे, मोपशि शेटे चालक पोहवा काकडे असे सरकारी वाहनात बसलो. तक्रारदार हे त्यांचे बलोनो कार क्रमांक. MH 14 LP 2321 यामध्ये बसुन आमचे मागोमाग लाप्रवि कार्यालयातुन निघाले. तेव्हा 13.00 वाजले होते. दोन्ही वाहने साधु वासवानी चौक- बंडगार्डन बंधारा विंश्रातवाडी- मार्गे आर्मी स्कुल दिघी येथे रोडचे कडेला थांबलो. आमचे पाठोपाठ तक्रारदारही थांबले. तेथे तक्रारदार यांना सरकारी वाहनामध्ये बसवुन त्यांना व पंचांना पुन्हा एकदा पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देण्यात आल्या. त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री खरमाटे यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. खरमाटे व पंच क्र. 1 श्री. शिंदे यांना तक्रारदार यांचे बलोनो कार क्रमांक. MH 14 LP 2321 यामध्ये बसवुन लोकसेवक पीएसआय गपाट यांचेशी बोलणी करण्याकरिता दिघी पोलीस स्टेशन पुणे येथे रवाना केले. ती वेळ 14:10 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक आर्मी स्कुल दिघी रोड परिसरात थांबुन राहीलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 सापळा पथक थांबलेले ठिकाणी परत आले.मी तक्रारदार यांचेडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. तेव्हा 15.29 वाजले होते. तेव्हा पंच क्रमांक 01 श्री संदेश शिंदे यांना पंच क्र 02 यांचेसमक्ष रवाना केल्यापासून येईपर्यत काय झाले याबाबत विचारणा केली. तेव्हा पंच क्रमांक 01 श्री संदेश शिंदे यांनी सांगितले कि, “ते व तक्रारदार श्री खरमाटे असे त्यांचे बलोनो कार क्र.MH 14 LP 2321 मधुन रवाना होवुन दिघी पोलीस स्टेशन येथे जावुन लोकसेविका यांचे कक्षाजवळ गेलो. तेथे कक्षात लोकसेविका दिसुन आल्या नाही. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना कॉल केला असता काही वेळाने त्या तेथे आल्या व त्यांचे कक्षात गेल्या. त्याचे मागोमाग मी व तक्रारदार असे त्यांचे कक्षात गेलो. तेथे माझे समक्ष कामाचे अनुषंगाने चर्चा झाली व पीएसआय गपाट यांनी हाताचे इशा-याने मला बाहेर थांबण्यास सांगितले. मी त्यांचे कक्षाचे बाहेर येवुन थांबलो व सदर कक्षाचे दरवाजाचे काचेमधुन आत पाहत होतो. तक्रारदार व पीएसआय गपाट यांचे संभाषण सुरू



Scanned with OKEN Scanner

असलेचे मला दिसत होते.त्यांनतर काही वेळाने तक्रारदार हे कक्षाचे बाहेर आले व आम्ही दोघे सापळा पथक थांबले ठिकाणी आलो".अशी हकीगत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार खरमाटे यांना पंचासमक्ष हकीगत विचारली असता यांनी सांगितले कि, "मी व पंच क्र.1 असे आम्ही दिघी पेाेलीस स्टेशन येथे जावुन लोकसेविका यांचे कक्षाजवळ गेलो.तेथे लोकसेविका दिसुन आल्या नाही. म्हणुन मी माझे व्हॉटसअपवरून त्यांना कॉल केला व स्पीकर देखील ऑन केला व बोलेलो. पीएसआय गपाट या काही वेळाने त्या तेथे आल्या.त्या त्यांचे कक्षात गेल्या त्याचे मागोमाग मी व पंच असे त्यांचे कक्षात गेलो.तेथे त्यांची भेट घेवुन तेथे मॅडमचे टेबल समोर बसुन बोलत असताना कामाबाबत चर्चा केली.त्यांनतर लोकसेविका गपाट यांनी हाताचे इशा-याने पंचांना बाहेर जाण्याबाबत सांगितले.त्यावेळी पंच कक्षातचे बाहेर गेले.ते आम्हाला दरवाजाचे काचेतुन पाहत हेाेते.ते मला दिसत होते.

मी लोकसेविका गपाट यांना कामाबाबत व यापुर्वी झालेल्या बोलण्याबाबत बोललेाे असता पीएसआय गपाट म्हणाल्या कि, "काय ते आजच्या आज करा" "पर हेड, काय करा.. जे आहे ते.. तुम्हाला सांगते, तुम्ही सांगा.. बघा तुमच्या हयाने किती करायचे ते, तुम्ही सांगा ना, मला तरी कळुदया" त्यावेळी तक्रारदार म्हणाले कि, "नाय पण, मला हया लोकांना.. मला तुम्ही सांगीतलेला आकडा बोलु दयाा. आम्ही त्यांच्या पाठीमागेच पण, तुम्ही कळु दया, परहेड दोन म्हणल्यावर देवू शकत नाय" त्यावर पीएसआय गपाट म्हणाल्या कि, "वाटल तर तुम्ही सांगा, निम्म करा.. काय तरी कराना मग तुम्ही." . त्यावर तक्रारदार पीएसआय गपाट यांना म्हणाले कि, "निम्म म्हणट तरी लाख रुपये होतात एवढयाच....चारजन म्हटले तर चार लाख होतात....लय होतय ना मग.." तेव्हा पीएसआय गपाट म्हणाल्या कि, "बर जाउ दया, मी काय म्हणते तीन मध्ये करुन टाका. जाउ दया" (01:02:10) त्यावर तक्रारदार यांनी पीएसआय गपाट यांना "तीन लाखात.. चौघाच ना"असे विचारले असता पीएसआय गपाट यांनी "ह". असे म्हणुन होकार दिला. तेव्हा तक्रारदार यांनी पीएसआय गपाट यांना "तीन लाख फायनल.. तीन लाख मध्ये होणार.. पाच साडे पाच पर्यत पोहच करतो. फक्त दाखल करा लवकर, माझ लय हेडॅक झालय डोक्याला हं..मी घेवुन येवूका?"असे विचारले असता पीएसआय गपाट यांनी "ह या" म्हणुन होकार दिला. त्यावेळी तक्रारदार यानी "चालतय, फक्त तीन पेक्षा वाढवू नका आता" असे म्हणाले असता पीएसआय गपाट यांनी "नाही नाही" असे म्हणुन "आपल्यातच राहू दया" असे तक्रारदार यांना सांगितले.त्यानंतर तक्रारदार कक्षाचे बाहेर येवुन माझे कारने पंच क्रमांक 01 यांचेसह सापळा पथक थांबेलल्या ठिकाणी परत आले. अशी हकीगत तक्रारदार यांनी पंचासमक्ष सांगितली.

त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॅाेरवर्ड करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच बरोबर व खरे असल्याची खात्री झाली. लोकसेवक पीएसआय चैताली गपाट यांनी तक्रारदार यांचेविरूदध दाखल गुन्हयाचा अ समरी अहवाल सादर करण्याकरिता 4 लोकांचे मिळुन स्वत करिता 3,00,000/-रूपये लाचेची मागणी करून ती दिंनाक 15/07/2026 रेाेजीच स्वीकारण्याची तयारी दर्शविली असलेचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार श्री खरमाटे यांना लोकसविका गपाट यांनी मागितलेली लाच रक्कम 3,00,000/- रूपये हजर करण्याबाबत सांगितले असता त्यांनी एवढी रक्कम त्यांचेकडे नसुन केवळ 1,00,000/ रूपये असलेचे सांगितले. व त्यांनी त्यांचे कारमध्ये असलेली 1,00,000/- रूपये रेाेख रक्कम त्यात भारतीय चलनातील 500 रु दराच्या 200 नोटा हजर केल्या. व उर्वरित 2,00,000/- रूपये हे 500रू दारच्या नोटासारख्या दिसणा-या खेळण्यातील नोटा वापरण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे आम्ही 2,00,000/-रूपयाच्या खेळणातील नोटा हजर केल्या. तक्रारदार यांनी 1,00,000/-रूपये (एक लाख) लाच रक्कम हजर केली. त्यात 500/-रूपये दराच्या 200 नोटा होत्या.सदर नोटांचे नंबर अंमलदाराचे मदतीने पंचासमक्ष कागदावर लिहून कागदावर पंचानी व मी सही केली.
माझे सुचनेप्रमाणे चालक पोहवा काकडे यांनी सरकारी वाहनातच तक्रारदार यानी हजर केलेल्या 200 नोटामध्ये 400 नोटा खेळण्यातील टाकुन त्याचे 2 बंडल तयार केले. सरकारी वाहनामध्येच तक्रारदार व पंच यांना अँथ्रॅसीन पावडरचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करून दाखविले. व सदर नोटांना लिफाफा व पांढ-या पिशवीला अँथ्रॅसीन पावडर लावुन लाचेची रक्कम एका फिक्कट हिरवट लिफाफ्यात ठेवुन सदर लिफाफा एका पांढरे पिशवीत ठेवुन सदर पिशवी तक्रारदार यांचे बलोनो कार चे ड्रायव्हरचे दरवाजाचे स्टोरेजमध्ये ठेवुन दिली



Scanned with OKEN Scanner

सापळा कारवाईचे अनुषंगाने सर्वान पुन्हा सुचना देवुन त्यानंतर तक्रारदार व पंच याचे सापळापुर्व निवेदन घेतले. त्याचे मपोशि शेटे यांनी व्हिडीओ रेकॉर्डिंग केले तेव्हा 17.02 वाजले होते.

. मी पुन्हा सर्वांना सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री खरमाटे यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला लावला. तक्रारदार श्री. खरमाटे व पंच क्र. 1 श्री.शिंदे यांना तक्रारदार यांचे बलेनो कार क्रमांक. MH 14 LP 2321 यामध्ये बसवुन लोकसेवक पीएसआय गपाट यांना दिघी पोलीस स्टेशन पुणे येथे भेटून लाच रक्कम देण्याकरिता रवाना केले. व आम्ही, पंच क्रमांक 02 सापळा पथकातील अंमलदार असे सरकारी वाहनामध्ये बसुन आर्मी स्कुल दिघी परिसरातुन त्याचे पाठोपाठ रवाना झालो. तेव्हा 17.21 वाजले होते. आम्ही उर्वरित सापळा कारवाई पथक काही अंतराने त्याचे मागोमाग दिघी पोलीस स्टेशनपासुन काही अंतरावर अलीकडे थांबुन गाडीतुन उतरून पायी दिघी पोलीस स्टेशनचे परिसरात व बाहेर सुरक्षित ठिकाणी थांबुन सापळा लावुन थांबुन राहीलो.

काही वेळाने तक्रारदार यांनी लोकसेवक पीएसआय गपाट यांचे कक्षाचे बाहेर मागील बाजुस येवुन डावा हात दोनदा डोक्यावरून फिरवुन लोकसेवकाने लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला. मी तसेच पोहवा/गदादे व मपोशि शेटे व पंच क्रमांक 02 लागलीच दिघी पोलीस ठाण्यात गेलो.मी पीएसआय गपाट यांचे कक्षाजवळ गेलो. तेथे पंच क्रमांक 01 यांना भेटलो. पंच क्रमांक 01 हे आम्हाला सदर कक्षाकडून ठाणे अंमलदार कक्षाकडे घेवुन गेले तेथे उभ्या असलेल्या महीला अधिका-याकडे इशारा करून याच लोकसेवक पी एस आय चैताली गपाट असलेचे सांगितले. तेथे पंच क्रमांक 02 नेहा काळे व मपोशि शेटे देखील आले. तेव्हा पोहवा गदादे यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. तेव्हा 17.49 वाजले होते. पंच क्रमांक 02 मपोशि शेटे यांचे मदतीने लोकसेविका गपाट यांना जागीच ताब्यात घेतले.त्यावेळी लोकसेविका यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव - चैताली बाळासाहेब गपाट वय 35 वर्ष पद-पोलीस उप निरीक्षक नेमणुक - दिघी पोलीस स्टेशन रा.फ्लॅट नंबर 1201, बी /2 ग्रॅण्ड बे मांजरी पुणे असे सांगितले.

त्यावेळी पोहवा गदादे यांनी सुचनेप्रमाणे व्हिडीओ रेकर्डिंग सुरू केले. तेव्हा पंचासमक्ष लोकसेवक महीला पोलीस उप निरीक्षक गपाट यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. तेव्हा पंच क्रमांक 01 श्री शिंदे यांना लोकसेविका गपाट यांनी लाच रक्कम कोठे ठेवली यांबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 01 यांनी सांगितले कि, लोकसेविका गपाट यांचे सांगणेप्रमाणे लाच रक्कम त्यांचे कक्षातील लाकडी रॅकचे खालचे कप्प्यात त्यांचे सांगणेप्रमाणे तक्रारदार यांनी ठेवली असे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही सापळा पथक असे सर्वजण महीला पोलीस उप निरीक्षक चैताली गपाट यांचे कक्षात गेलो. तेथे पंच क्रमांक 01 यांनी कक्षातील लाकडी रॅकचे खालचे कप्प्यातुन एक पांढरे रंगाची लाच रक्कम असलेली पिशवी सर्वासमक्ष हजर केली. ती पंचासमक्ष उघडून पाहीली असता त्यामध्ये एक फिक्क्टर हिरवट रंगाचा लिफाफा होता तो लिफाफा उघडला असता त्यामध्ये 500 रूपये दाराच्या नोटांचे 2 बंडल दिसले त्यात एकुण 200/- ख-या चलनी नोटा व 400 खेळण्यातील नोटा असे एकुण 600 चलनी नोटा 3,00,000/-रूपये अशी लाच रक्कम दिसुन आली. सदर नोटांचे दोन्ही बंडल बाहेरकाढले व कक्षामध्ये लाईट बंद करून कृत्रिम अंधार करून अॅल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात पाहीले असता हस्तगत केलेल्या लाचरकमेच्या नोटांवर अँथ्रॅसीन पावडरची फिकट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच फिक्कट हिरवा लिफाफा व पांढरे पिशवीवर देखील अँथ्रॅसीन पावडरची फिकट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली..त्यानंतर पंच क्रमांक 02 यांचेकडे यापुर्वी देण्यात आलेल्या कागदावर लिहेल्या नोटांचे नबंर व लाच रकमेतील प्रत्यक्ष नोटाचे नंबरची पाहणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. तसेच पंच क्रमांक 01 यांचे हाताची पाहणी केली असता त्याचे दोन्ही हातावरचे तळव्यायवर व बोटावर अँथ्रॅसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसुन आली. तसेच सदर लाकडी रॅकचे खालचे कप्प्याची अॅल्ट्राव्हायलेट दिव्याने पाहणी केली असता लाच रकमेची पिशवी ठेवलेल्या ठिकाणी अँथ्रॅसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसुन आली.त्याचे रेकॉर्डिंग करण्यात आलेले आहे. तसेच तक्रारदार यांचे उजवे हाताचे तळावर बोटावर अँथ्रॅसीन पावडरची चकाकी दिसुन आली.

त्यानंतर पंच क्रमांक 01 श्री शिंदे यांना रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले कि,ते व तक्रारदार खरमाटे असे तक्रारदार यांचे बलेनो कार MH 14 LP 2321 मधुन दिघी पोलीस स्टेशन येथे येवुन कार पार्क केली. तक्रारदार यानी लाच रकमेची पिशवी उजव्या हातात घेतली. आम्ही

Scanned with OKEN Scanner

लोकसेविका गपाट यांचे कक्षाजवळ चालत गेलो. सदर कक्ष बंद होता. व तेथे त्या दिसुन न आलेने तक्रारदार यांनी लोकसेविका गपाट यांना व्हाटसप कॉल करून स्पीकर ऑन करून बोलणे केले तेव्हा त्यांनी 5 मिनिटात येते असे सांगितले.त्या आल्यानंतर त्या त्यांचे कक्षात गेल्या व त्याचे मागोमाग तक्रारदार व मी देखील कक्षात गेलो.तेथिल पीएसआय गपाट यांचे समोरील खुच्र्यावर बसलो.त्यावेळी तक्रारदार यांनी लाच रकमेची पिशवीतील लिफाफा काढत "ह ठेवा" असे विचारले असता पीएसआय गपाट यांनी "पिशवी राहुदया" असे सांगितले.तेव्हा तक्रारदार यांनी "तुम्हाला पाहीजे बॅग" "पॅकेट ठेवा असच... बर बॅग ठेवतो" असे सांगितले.त्यावेळी पीएसआय गपाट यांनी हाताने इशारा करून सदर लाच रकमेची पिशवी त्यांचे कक्षातील लाकडी रॅक मध्ये ठेवण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी " कशात त्या ड्राव्हर मध्ये असे विचारले असता पीएसआय गपाट यांनी "ह" म्हणुन होकार दिला. तेव्हा तक्रारदार यांनी पीएसआय गपाट यांना "कोणी घेणार नाही ना" असे विचारले. तेव्हा पीएसआय गपाट म्हणाल्या कि "माझच ये कोणी नाही घेत."तेव्हा तक्रारदार पीएसआय गपाट यांना म्हणाले कि, "तुम्ही म्हणले तेवढे आहे. बरोबर आहे तीन लाख बरका" असे बोलुन पीएसआय गपाट याचे सांगणेप्रमाणे लाकडी रॅकचे खालचे कप्यात लाच रकमेची पिशवी ठेवली. व इतर कामाविषयी बोलणी झाली व त्यांनतर मी व तक्रारदार असे पीएसआय गपट यांचे कक्षाचे बाहेर आलो. व तक्रारदार यांनी कक्षाचे बाहेरील मागील बाजुस जावुन आपणास सापळा पथकास डोक्यावरून डावा हात फिरवुन लाच रक्कम स्वीकारलेबाबात इशारा केला. तेव्हा पीएस आय गपाट हया कक्षातुन पोलीस स्टेशनचे ठाणे अंमलदार कक्षाकडे चालत गेल्या. व आपण तेथे आला. मी तुम्हाला ठाणे अंमलदार कक्षाकडे नेवुन पीएसआय गपाट यांना दाखविले. अशी हकिगत सांगितली. .

त्यांनतर तक्रारदार श्री खरमाटे याना पंचसमक्ष रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले कि,ते व पंच 01 श्री शिंदे असे त्याचे बलेनो कार MH 14 LP 2321 मधुन दिघी पोलीस स्टेशन येथे येवुन कार पार्क केली. व लाच रकमेची पिशवी उजवे हाता घेतली. नंतर चालत पीएसआय गपट यांचे कक्षाजवळ चालत गेलो. सदर कक्ष बंद होता. व तेथे पीएसआय गपाट दिसुन न आलेने मी त्यांना व्हाटसअप कॉल करून स्पीकर ऑन करून बोलेणे केले. त्यांनी 5 मिनीटात येतो असे सांगितले. त्या आल्यानंतर त्यांचे कक्षात गेल्या त्याचे मागोमाग मी व पंच देखील गेलो. तेथिल पीएसआय गपाट यांचे समोरील खुच्र्यावर बसलो. तेथे मी पीएसआय गपाट यांनी माझेकडील लाच रक्कम असलेला पिशवीतील लिफाफा देत असताना त्यांनी हाताने इशारा करून लाकडी रॅक मध्ये ठेवण्यास सागितले. त्याप्रमाणे मी लाच रक्कम असलेली पिशवी लाकडी रॅकचे खालचे कप्यात ठेवली. व कामाबाबात बोलालो असे सांगुन पंच क्रमांक 01 यांचेप्रमाणे मिळती जुळती हकीगत सांगितली. व त्यांनतर मी कक्षाचे बाहेर मागील बाजुस येवुन लाच रक्कम स्वीकारलेबाबत डावा हात डोक्यावूर दोनदा हात फिरवुन पुर्वनियोजित इशारा केला. त्यांनतर महीला पोलीस व पंच याचेसमक्ष पीएसआय चैताली गपाट यांना ताब्यात घेतले. अशी हकीगत सांगितली.

त्यांनतर आम्ही पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता तक्रारदार व पंचानी सांगितलेप्रमाणे हकीगत बरोबर आहे. सदर झाले कारवाईचा सविस्तरपणे पंचनामा करण्यात आलेला आहे. व मेमरी कार्डच्या हॅश व्हॅल्यू घेण्यात आल्या आहेत.

तरी आरोपी लोकसेविका चैताली बाळसाहेब गपाट वय 35 वर्ष पद- पोलीस उप निरीक्षक, नेम -दिघी पोलीस स्टेशन रा.1202 बी/2 ग्रॅण्ड बे मांजरी पुणे यांनी दिंनाक 15/07/2026 रोजी दिघी पोलीस स्टेशन येथे झालेल्या पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार व इतर 6 लोकांविरूदध दिघी पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हा नोंद क्रमांक 189/2026 या गुन्हयाची अ वर्ग समरी पाठविण्याकरिता तक्रारदार व त्यांचे ओळखीतील इतर 3 जण अशा 4 लोकांना मदत करण्याकरिता म्हणुन स्वत करिता तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे 3,00,000/रूपये ( तीन लाख रूपये ) लाचेची मागणी केली.व स्वत स्वीकारण्याची तयारी दर्शवली. व दिंनाक 15/07/2026 रोजी रक्कम घेवुन येण्याबाबत सांगितले. सापळा करवाई दरम्यान 3,00,000/-रूपये (तीन लाख रूपये ) लाच रक्कम पंचासमक्ष स्वीकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले. चैताली बाळसाहेब गपाट वय 35 वर्ष पद- पोलीस उप निरीक्षक नेम दिघी पोलीस स्टेशन यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार व इतर यांचेविरूदध दाखल गुन्हयामध्ये मदत करण्याकरिता व अ वर्ग समरी अहवाल सादर करण्याकरिता म्हणुन स्वत करिता 3,00,000/- रूपये (तीन लाख रूपये ) लाच रक्कम मागणी करू.न ती स्वत स्वीकारली. म्हणुन लोकसेविका चैताली बाळसाहेब गपाट वय 35 वर्ष पद- पोलीस उप निरीक्षक नेम दिघी पोलीस स्टेशन रा.1202 बी/2 ग्रॅण्ड बे मांजरी पुणे याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिंयाद आहे.



Scanned with OKEN Scanner

माझा वरील फिंयादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

समक्ष हा फिंयादी जबाब दिला

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Nitin Ramnath Fhatagre(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

ठाणे अमलदार
दिघी पो स्टे. पिंपरी चिंचवड

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Nitin Ramnath Fhata

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PI

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

Scanned with OKEN Scanner